ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627


# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, २ डिसेंबर, १९७० | अंक २१


# विविधोपयोगिता

**किर्लोस्कर पंपांचे हे वैशिष्टय होय !**



गेल्या अर्ध शतकाहून अधिक काळ आम्ही अनेक प्रकारच्या उपयोगांसाठी विविध प्रकारचे पंप तयार करीत आहो. किर्लोस्कर पंपाच्या प्रत्येक भागांत आमची श्रेष्ठ दर्जाबद्दलची परंपरा आणि उत्पादनाचा दीर्घ अनुभव व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संयोग झाला आहे.

**विविध प्रकारच्या**
**किर्लोस्कर पंपांची उपयुक्तता**

• शेतीला पाणी पुरवठा • पिकावर पाणी शिंपडण्याच्या योजना • वॉटर वर्क्स • बूस्टर सर्व्हिस
• सीवेज • ड्रेनेज • सँडी वॉटर • स्टॉर्म वॉटर
• फायर फायटिंग • खाणी • रासायनिक, कागद व साखर कारखाने • प्रोसेसिंग प्लँटस् • व्हिस्कस लिक्विडस्
• तेलशुद्धि कारखाने • डेअरीज • डिस्टिलरीज
• खत कारखाने

*किर्लोस्कर*

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२.



यूपी एसव्हीए सीएच एमएफ के वीएचआर

STUBA ɑ/ɑ

**कॉलेजातील विद्यार्थ्यांची प्रचंड संख्या**— कॉलेजे आणि विद्यापीठे ह्यातील विद्यार्थ्यांची संख्या दर साल २,५०,००० ने वाढत आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-संख्येत दर साल १३% ने वाढ होत आहे. १९६७–६८ मध्ये ती २२·१९ लक्ष होती; १९६८–६९ मध्ये २४·७३ लक्ष होती; १९६९–७० मध्ये ती २७·७७ लाखांवर गेलेली असेल. कॉलेजांची संख्या १९६५–६६ मध्ये २,५७७ होती ती १९६८ मध्ये ३,११२ झाली आणि आता ती ३,३०० झाली आहे.

**मध्यवर्ती मंत्र्यांसाठी परदेशी मोटारी** — प्रत्येक मंत्रालयासाठी फक्त एक परदेशी मोटार खरीदण्याची परवानगी आहे. अशा रीतीने मध्यवर्ती सरकारने ३० ते ४० परदेशी मोटारी खरेदी केल्या आहेत.

**म्हैसूरचे कन्नडनाडू!** म्हैसूर राज्याचे नाव बदलावे आणि त्याला कन्नडनाडू हे नाव देण्यात यावे, असे म्हैसूरचे शेतीमंत्री श्री. राचय्या ह्यांनी म्हैसूरमधील एका भाषणात सांगितले.

**भारताने न्यूझीलंडकडून बॉंबर विमाने खरीदली** — न्यूझीलंडने रॉयल न्यूझीलंड एअर फोर्स बॉंबर्स विक्रीला काढली, कारण त्यांची जागा त्या देशात स्कायहॉक फायटर विमानांनी घेतली आहे. विक्रीस काढलेल्या बॉंबर्सपैकी १० बॉंबर्स भारत सरकारने खरीदले आहेत.

**पाकिस्तानी वादळग्रस्तांना अमेरिकेची मदत** — पूर्व पाकिस्तानातील वादळग्रस्तांसाठी अमेरिकन सरकारने ७·५ कोटी रु. ची प्राथमिक देणगी दिली असून तिच्या योग्य विनियोगासाठी यंत्रणाही निर्माण केली आहे. ह्यापूर्वी दिलेल्या देणगीत आणि तंबू व ब्लँकिटे ह्यांच्या देणगीत ह्या मदतीने भर पडली आहे. सर्व मदत वेळेवर पोचविण्यासाठी अमेरिकेने सहा हेलिकॉप्टर्सही दिली आहेत.

**धूम्रपान सोडण्यासाठी समुद्रपर्यटण** — आपले धूम्रपानाचे व्यसन सोडण्यासाठी न्यूयॉर्कहून २५० लोक कॅरिबिअन समुद्र पर्यटणासाठी निघाले आहेत. प्रत्येकाला ह्या पर्यटणासाठी सुमारे १५,००० रु. खर्च येईल. तेरा दिवस हे सर्वजण "पाण्यावर" राहतील. ताजी हवा, नवे चेहरे, समान उद्दिष्ट, ह्या सर्वांमुळे धूम्रपानाच्या व्यसनातून आपली मुक्तता होईल, अशी त्यांची अपेक्षा आहे.

**रेल्वे सामानाच्या चोऱ्या** — रेल्वे सामानाच्या चोऱ्यांमुळे १ एप्रिल ते ३० सप्टेंबर, १९७० अखेरच्या सहामाहीत हिंदी रेल्वेजचे ८१·७ लक्ष रुपयांचे नुकसान झाले.

**वास्को द गामाचे नवे नाव "संभाजी"**—गोव्यामधील वास्को द गामा हे एक महत्त्वाचे शहर आता "संभाजी" ह्या नावाने ओळखले जाईल. सन १४९७ मध्ये वास्को द गामाने केप ऑफ गुडहोप मार्गे भारताला येण्याचा समुद्रमार्ग शोधून काढला, त्याच्या स्मरणार्थ हे नाव त्या गावास देण्यात आले होते. भारतातील पोर्तुगीज वसाहतींचा तो नंतर व्हाइसरॉय झाला.

**थायलँडसाठी भारतीय रेल्वेतज्ज्ञ** — थायलँडमधील उतारूंच्या आगगाड्यांचा वेग वाढविण्याच्या कामी थायलँडच्या स्टेट रेल्वेला मदत करण्यासाठी तीन हिंदी रेल्वेतज्ज्ञ तिकडे रवाना झाले आहेत.

**रशियाचे आणखी ३,००० ट्रॅक्टर्स येणार** — भारत रशियाकडून आणखी ३,००० ट्रॅक्टर्स विकत घेणार आहे. सध्या भारतात २०,००० रशियन ट्रॅक्टर्स कामावर आहेत. म्हणजे भारतातील एकूण ट्रॅक्टर्सपैकी एक तृतीयांश रशियन बनावटीचे आहेत.

**महाराष्ट्रात आणखी २० सहकारी साखरकारखाने**— महाराष्ट्र सरकारला राज्यात आणखी २० सहकारी साखर कारखाने काढण्यास लायसेन्स देण्याची परवानगी मिळाली आहे. त्यातील सुमारे दहा मराठवाड्यात, दोन विदर्भात आणि एक कोकणात, असे १३ कारखाने प्रथम काढण्यात येतील.

**परदेशी बँकांतील ठेवी वाढल्या**—भारतातील १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर ठेवी परदेशी बँकांकडे वळू लागल्या आहेत. ह्या प्रश्नाचा अर्थमंत्री विचार करीत आहेत. राष्ट्रीयीकरणानंतरच्या पहिल्या काही महिन्यांत राष्ट्रीयीकृत बँकांतील ठेववाढ निराशाजनक होती. आता परिस्थिती सुधारत आहे. १८ जुलै, १९६९ ते १७ जुलै, १९७० ह्या काळात त्यांच्या ठेवी १४·२% ने वाढल्या. गतवर्षीची त्याच काळातील वाढ १४·७% होती.

**सिगारेटच्या धंद्यातील परदेशी भांडवल**—भारतामधील सिगारेटच्या धंद्यात २०·५० कोटी रु. भांडवल गुंतलेले आहे, त्यापैकी १६·४० कोटी रु. भांडवल परदेशी आहे.


बँकेतील नोकरीसाठी बँकिंग विषयाचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळवा.

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

तिसावी बॅच सोमवार दि. १४ डिसेंबरपासून सुरू होईल.

**मुदत – ३ महिने. मर्यादित प्रवेश.**

वेळ – संध्याकाळी ६ ते ७

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार, जिजामातावागेसमोर, पुणे २. टे. नं. ५४९६०

☆ अर्थ ☆

बुधवार, ९ डिसेंबर, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


# साखरेच्या धंद्याची चौकशी

## व्यापक आणि गुंतागुंतीचे स्वरूप

साखरकारखानदारीच्या धंद्याची सर्वांगीण चौकशी करण्यासाठी २७ सप्टेंबर रोजी एक कमिशन नेमण्यात आले. त्याला आपले काम पुरे करून अहवाल ऑगस्ट, १९७१ पूर्वी सादर करण्यास सांगितले आहे. चौकशीची व्याप्ती एवढी मोठी आहे की ह्या मुदतीत कमिशनचे काम पुरे होण्याची शक्यता फारच कमी आहे. कमिशनचा अहवाल हाती आल्यानंतरच साखरेच्या धंद्याचे राष्ट्रीयीकरण करावयाचे किंवा नाही ह्याचा सरकार काळजीपूर्वक विचार करील, असे अन्न आणि शेती मंत्री श्री. फकिरुद्दिन अहमद, ह्यांनी म्हणले आहे. साखरेच्या धंद्याचा गेल्या १० वर्षांचा आढावा घेऊन येत्या १५ वर्षांच्या वाढीचा तपशीलवार आराखडा करणे, त्याचप्रमाणे ‘ सिक ’ कारखान्यांचा प्रश्न सोडविणे, ही कामे कमिशनकडे सोपविलेली आहेत.

भारतात साखरेचा धंदा कापडाच्या गिरण्यांच्या खालोखाल मोठा आहे. भारतात एकूण २१८ साखरकारखाने असून त्यांची उत्पादनक्षमता ३५·५ लक्ष टनांची आहे. त्यापैकी २४ लक्ष टन जॉइंट स्टॉक विभागात आणि ११·५ लक्ष टन सहकारी विभागात आहेत. काही नवे लायसेन्स आणि लेटर्स ऑफ पेटंट देण्यात आली आहेत, त्यामुळे कारखान्यांची उत्पादनक्षमता लवकरच ४९ लक्ष टनांवर जाईल.

पहिली पंचवार्षिक योजना सुरू होण्यापूर्वी भारतात फक्त एकच सहकारी साखरकारखाना होता; गेल्या गळिताच्या हंगामात त्यांची संख्या ६९होती आणि त्यांनी साखरेच्या उत्पादनापैकी ३२% साखरेचे उत्पादन केले. ४४ सहकारी साखर कारखान्यांसाठी नवे लायसेन्स आणि लेटर्स ऑफ पेटंट दिली आहेत. त्यांचे कारखाने उभारले गेले म्हणजे सहकारी साखरकारखान्यांची संख्या ११३ होऊन त्यांची उत्पादनक्षमता २२·३ लक्ष टन होईल.

महाराष्ट्रातील साखरेचे उत्पादन आणि उसाची लागवड ह्यांच्या मानाने उत्तर प्रदेश आणि बिहार येथील उत्पादन आणि लागवड फारच असमाधानकारक आहे. येथील बहुतेक कारखान्यांत नव्या यंत्रसामग्रीची तीव्र आवश्यता आहे, जुनी यंत्रसामग्री बदलण्याची गरज आहे; त्याखेरीज ते टिकणे अशक्य आहे. हे सर्व कारखाने जुने आहेत आणि त्यांची उत्पादनक्षमता सुधारणे फारच खर्चाचे काम आहे. कारखानेच आर्थिक अडचणीत असल्यामुळे ऊसकऱ्यांना उसाचे पैसे वेळेवर आणि वक्तशीर मिळू शकत नाहीत. ह्याचा अर्थ शेतकऱ्यांची अडचण करूनच कारखाने कसेतरी चालू राहू शकत आहेत. ह्याचा परिणाम म्हणजे शेतकरी नाखूष आहेत, इतकेच नव्हे तर ते शेतीची पद्धतीही सुधारू शकत नाहीत. त्या कारणाने उसाचे उत्पादनही अकार्यक्षम आणि अपुरे होते.

महाराष्ट्रात साखरकारखान्याला ऊस पुरविणारांची संख्या प्रत्येकी सरासरीने १,८०० आहे. उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागात तीच संख्या २८,००० आहे ! सबंध भारतात एकूण २५ लक्ष ऊसकरी साखरकारखान्यांना ऊस घालतात. त्यांची संख्या आणि वेगवेगळी परिस्थिती ह्यामुळे हा सबंध प्रश्नच अत्यंत अवघड आणि गुंतागुंतीचा होऊन बसला आहे आणि कमिशनने त्यावर उपाय सुचवावयाचा आहे.

साखरकारखान्यातून सुमारे २,००,००० कामगार हंगामी स्वरूपाचे असतात. हंगामाचा काळ सालोसाल, कारखान्या-कारखान्यात, वेगवेगळा असतो. १९६९-७० मध्ये, केरळमधील एका कारखान्याचा हंगाम फक्त ३६ दिवसांचा होता, तर म्हैसूरमधील मंड्या कारखाना ३१७ दिवस चालला. बहुतेक सर्व कारखान्यांत बहुसंख्य कामगार वर्षातील बहुसंख्य दिवस बेकारीच अनुभवतात. ह्या मनुष्यबळाचा जास्तीत जास्त राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने काय उपयोग करून घेता येईल, हेही कमिशनने सांगावयाचे आहे.

साखरेचा पुरवठा कधी भरपूर होतो, तर कधी तो अत्यंत अपुरा पडतो. मागणी—पुरवठ्याचा दीर्घकालीन मेळ घालण्यासाठी आणि ऊसउत्पादन व साखर उत्पादन ह्यांतील अनिश्चितता नष्ट करण्यासाठीही कमिशनला डोके खाजवावे लागणार आहे.

एवढ्या महत्त्वाच्या आणि प्रचंड प्रमाणावरील गुंतागुंतीच्या धंद्याच्या परिस्थितीचा सर्वांगीण विचार करून व्यावहारिक शिफारशी करण्याचे काम कमिशनने करावयाचे आहे. “ आम्हांस दिलेल्या मुदतीनंतरही आमचे काम अपुरे राहिले, तर ते आमच्या कुठल्याही दोषांमुळे किंवा आमचे प्रयत्न कमी पडले म्हणून अपुरे राहिलेले असणार नाही; कामाचे स्वरूपच तसे आहे ” असे कमिशनचे चेअरमन, श्री. दीपनारायण सिंह ह्यांनी सांगितले आहे, ते उगीच नाही.

———

## राष्ट्रीयीकृत बँकांसाठी विभागीय सल्लागार समित्या, संचालक मंडळे आणि व्यवस्थापक मंडळ्या ह्यांच्या तरतुदी

बँकिंग (कंपनीज अॅक्विझिशन अँड ट्रॅन्स्फर ऑफ अंडरटेकिंग्ज) कायद्याच्या ९ व्या कलमानुसार राष्ट्रीयीकृत १४ बँकांच्या व्यवस्थापनाची योजना आता तयार झाली असून ती पार्लमेंटच्या मंजुरीनंतर अमलात येईल. रिझर्व्ह बँकेला आणि मध्यवर्ती सरकारला बँकिंगच्या विकासविषयक सल्ला देण्यासाठी रिजनल कन्सल्टेटिव्ह कमिटया नेमल्या जातील. त्यामुळे राज्य आणि युनियन टरिटरीच्या सरकारांना बँकिंगच्या विकासात भाग घेण्यास मिळेल. ह्या कमिटीच्या सभांचे अध्यक्षस्थान अर्थमंत्री किंवा अर्थखात्यातील उपमंत्री हे स्वीकारतील. प्रत्येक राज्याचे दोन प्रतिनिधी आणि युनियन टेरिटरीचा एक प्रतिनिधी त्याचप्रमाणे त्या विभागातील प्रमुख बँकांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी, असे विभागीय कमिटयांचे सभासद असतील. ह्या सभांस हजर राहण्यासाठी रिझर्व्ह बँक आपला एखादा वरिष्ठ अधिकारी पाठवू शकेल. रिझर्व्ह बँक आणि मध्यवर्ती सरकार यांच्या विचारार्थ ह्या कमिटया शिफारसी करतील. अशारितीने पाच विभागांसाठी पाच कमिटया असतील. पश्चिम विभागात गुजरात, महाराष्ट्र, गोवा-दमण-दीव, दादरा-नगरहवेली, ह्यांचा समावेश होईल.

प्रत्येक मोठ्या बँकेला कमाल १५ डायरेक्टर असू शकतील. लहान बँकांसाठी लहान डायरेक्टर बोर्ड नेमण्याचा मध्यवर्ती सरकारला अधिकार आहे. बोर्डाच्या बिगर-सरकारी अधिकाऱ्यांची मुदत तीन वर्षांची असेल. सरकारी डायरेक्टरांना केव्हाही काढता येईल किंवा कितीही वर्षे त्यांना ठेवता येईल. वर्षातून सहा तरी बोर्डाच्या सभा झाल्या पाहिजेत, प्रत्येक तिमाहीत एक तरी सभा झाली पाहिजे. सरकार कोणत्याही डायरेक्टरला रिझर्व्ह बँकेचा सल्ला घेऊन पार्ट-टाइम चेअरमन नेम शकेल किंवा तोच मनुष्य चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून नेमला जाईल. प्रत्येक बँकेच्या परिस्थितीस अनुसरून त्याबाबत निर्णय केला जाईल. बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना बोर्डावर प्रतिनिधित्व मिळावे ह्यासाठी अवार्ड लागू असणारे कर्मचारी आणि अधिकारी ह्या दोघांनाही प्रतिनिधित्व देण्यात आले आहे.

प्रत्येक बँकेसाठी एक मॅनेजिंग कमिटी असेल आणि बोर्डाने (रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्यानुसार, मध्यवर्ती सरकारच्या मंजुरीनंतर) दिलेले अधिकार ती उपभोगील. प्रत्येक बँकेच्या मॅनेजिंग कमिटीत चेअरमन, रिझर्व्ह बँकेचा आणि मध्यवर्ती सरकारचा नियुक्त डायरेक्टर आणि बोर्डावरील बिगर-सरकारी डायरेक्टरांपैकी कमाल चार डायरेक्टर, ह्यांचा समावेश असेल. ह्या चार जणांची नेमणूक एका वेळी एका वर्षापेक्षा अधिक काळासाठी असणार नाही. बोर्ड विवक्षित कामी सल्ला देण्यासाठी आणखी कमिट्या नेमू शकेल.

---

## डी. डी. टी. ला आज तरी पर्याय नाही

डी. डी. टी. चा कीडनाशासाठी उपयोग झाला तरी त्यामुळे आजूबाजूचे वातावरण आणि पाणी दूषित होते, अशी जुनीच तक्रार आहे. ह्या संबंधात लोकसभेमधील चर्चेमध्ये चिंता व्यक्त करण्यात आली. काही पाश्चात्य देश स्वदेशात डी. डी. टी. च्या विक्रीवर बंधने घालतात, परंतु विकसनशील देशांकडे त्यांच्या निर्गतीस मात्र भरपूर उत्तेजन देतात; म्हणजे, गरीब देशांवरील दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करून स्वतः मात्र पैसे कमवतात असा त्यांच्यावर आरोप आहे. त्यात फारसे तथ्य नाही. डी. डी. टी. ला आज पर्यायच नाही; तत्सम इतर द्रव्ये अधिक महाग तर पडतातच, पण त्यांचे दुष्परिणामही अधिक होतात, असा अनुभव आहे. अधिक स्वस्त आणि अधिक चांगला पर्याय शोधून काढणे हाच खरा उपाय आहे. डी. डी. टी. सारख्या रासायनिक द्रव्यापेक्षा वनस्पतिजन्य उपाय अधिक उत्तम.. परंतु तो सापडण्यासाठी खूपच दीर्घकाल संशोधनाची आवश्यकता आहे.

---

## भारतीयांच्या डोळ्यांतील मोतीबिंदू काढण्यासाठी ब्रिटिश सोसायटीचा उपक्रम

भारतात पुष्कळ ठिकाणी मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यासाठी शिबिरे भरविण्यात येतात, परंतु त्यासाठी मनुष्यबळ आणि आर्थिक बळ कमी पडते आणि लक्षावधी लोकांना निष्कारण अंधत्व पत्करावे लागते. खेड्यांतील लोक आपण होऊन शहरात जाऊन शस्त्रक्रिया करून घेण्यास उत्सुक नसतात; त्यासाठी लागणारा पैसाही त्यांच्याजवळ नसतो. म्हणून, डॉक्टरांनीच खेडोपाडी जाऊन शस्त्रक्रिया करणे हितकारक ठरते. ग्रेट ब्रिटनमधील 'रॉयल कॉमनवेल्थ सोसायटी फॉर दि ब्लाइंड' ने ह्या बाबतीत पुढाकार घेऊन १५ महिन्यांचा एक कार्यक्रम आखला आहे. भारतातील दहा लक्ष लोकांपेक्षा अधिक लोकांना मोतिबिंदूमुळे दिसत नाही, त्यांपैकी काहींना तरी त्यामुळे दृष्टी प्राप्त होईल.

---

## अमेरिकेकडे जाणाऱ्या शास्त्रज्ञांची आणि इंजिनिअर्सची संख्या कमी होत जाणार

मोठ्या पगाराच्या आशेने सबंध जगातून अमेरिकेत शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ जाण्याची लाट आता ओसरली आहे, इतकेच नव्हे तर ती उलटली आहे. तेथील बेकारी, महागाई आणि 'सामाजिक व राजकीय वातावरण' ह्यांस कंटाळून कित्येक लोक स्वदेशाकडे परतू लागले आहेत. धंदा कमी झाला, म्हणजे परदेशी माणसाला सर्वप्रथम काढून टाकले जाते. अमेरिकेत येणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. गेल्या वर्षी ती १०,२५५ म्हणजे त्या वर्षापूर्वीच्या वर्षापेक्षा ३,००० ने कमी होती. भारतातून होणारी शास्त्रज्ञांची निर्यात मात्र चालू आहे. १९६९ मध्ये भारतातून १,९६९ इंजिनिअर आणि शास्त्रज्ञ अमेरिकेत गेले. कोणत्याही इतर देशांतून इतके इंजिनिअर व शास्त्रज्ञ अमेरिकेत गेले नाहीत.

## किर्लोस्कर कन्सल्टंटस् लिमिटेडचे अध्यक्ष

# श्री. शंतनुराव किर्लोस्कर

## यांनी सातव्या वार्षिक सभेत केलेल्या भाषणाचा गोषवारा

### तारीख २६ नोव्हेंबर १९७०



आपल्या कंपनीच्या सातव्या वार्षिक सभेला मी तुमचे मनःपूर्वक स्वागत करतो. कंपनीचा वार्षिक अहवाल आपल्या सर्वांना मिळालेलाच आहे आणि तुम्ही सर्वांनी तो वाचला आहे असे मी गृहीत धरतो.

कंपनीच्या अध्यक्षांनी गतवर्षातील कंपनीच्या घडामोडीचा परामर्श घेणे ही रूढ पद्धत आहेच. मी आज ही रूढी मोडून याहून जास्त महत्त्वाच्या गोष्टींचा आढावा घेणार आहे.

तुमच्या कंपनीने ह्या वर्षाकरिता २५ टक्के डिव्हिडंड दिला आहे ही कौतुकास्पद गोष्ट आहे. यासाठी कंपनीच्या ग्राहकांचे सहकार्य व त्याहून जास्त म्हणजे सेवक वर्गाचे परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. तुमच्या कंपनीचा ग्राहकवर्ग हा सरकारी, निम-सरकारी, खाजगी, सहकारी, व लघू उद्योगिक क्षेत्रांत पसरलेला आहे.

विकासाला आर्थिक मदत देण्यासंबंधीचे शासनाचे धोरण जाहीर झाल्यापासून छोट्या उद्योगधंद्यांचा विकास झपाट्याने होऊ लागला आहे. शासनाच्या नवीन धोरणामुळे छोटे उद्योगधंदे करू इच्छिणाऱ्यास प्रत्यक्ष मदत मिळण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. आतापर्यंत छोट्या उद्योगधंद्यांची आर्थिक कुचंबणा फारच होत होती. मला तुम्हांला कळविण्यास आनंद होतो की, तुमच्या कंपनीने अशा लोकांना आर्थिक साहाय्य मिळण्यास मदत केली आहे. ह्या संदर्भात मला स्टेट इंडस्ट्रिज अॅन्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पोरेशन, महाराष्ट्र स्टेट स्मॉल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, गुजराथ स्टेट फायनान्सियल कॉर्पोरेशन, राजस्थान स्टेट मिनरल अॅन्ड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, पंजाब इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, जम्मू आणि काश्मीर इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांच्या नवोदित कारखानदारांकडे बघण्याच्या प्रागतिक दृष्टिकोना-बद्दल धन्यवाद द्यावेसे वाटतात.

आर्थिक साहाय्य घेतलेल्यांपैकी काही कारखानदारांस जरी अपयश आले तरी सध्याच्या पुरोगामी धोरणात या संस्थांनी बदलू नये असे मला आवर्जुन म्हणावेसे वाटते. धंद्याला यश-अपयश अभिप्रेत आहे.

कारखानदारांच्या वाढीसाठी आर्थिक साहाय्य देण्यासंबंधी शासनाच्या पुरोगामी धोरणाचा तुमच्या कंपनीलासुद्धा फायदा मिळालाच आहे. कंपनीच्या ग्राहकांची अलीकडील संख्या हेच सिद्ध करत नाही का? खरोखरच ह्या पुरोगामी आर्थिक धोरणामुळे छोट्या कारखानदारांना विस्तारास चालना मिळालेली आहे.

देशातील सल्लागार संस्थांची वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने जाहीर केलेल्या धोरणाबद्दल शासन अभिनंदनास पात्र आहे. ही कृती स्पृहणीय आहे व शासनाचा देशातल्या तांत्रिक ज्ञाना-बद्दलच्या वाढत्या आत्मविश्वासाचे द्योतक आहे.

१९६९ च्या फायनान्स अॅक्टान्वये भरीव स्वरूपाच्या कर-विषयक सवलती देशातील सल्लागार संस्थांना शासनाने जाहीर केल्या आहेत. परंतु सवलती मिळण्यासाठी सध्या असलेली शासकीय यंत्रणा आणि पद्धती अधिक सुलभ करण्याची आवश्यकता आहे. सध्याची पद्धती ही क्लिष्ट असल्याने जाहीर केलेल्या सवलती मिळतील अशी अजून खात्री नाही.

वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये देशांतील सल्लागार संस्थांना अग्रहक्क देण्याचे धोरण शासनाने प्रत्यक्ष कृतीत आणावयास हवे. ज्या क्षेत्राविषयी तांत्रिक ज्ञान उपलब्ध आहे तिथे या समस्या उद्‌भवत नाहीत. परंतु काही क्षेत्रांमध्ये परदेशीय तांत्रिक ज्ञानाची अतिशय निकड आहे. शासनाचे या संबंधीचे धोरण दुराग्रहाचे वाटते. परदेशी चलनाची अडचण असली तरीसुद्धा देशाच्या औद्योगिक विकासासाठी परदेशी तांत्रिक ज्ञान आवश्यक आहे. कारण या ठिकाणी आपण काळाशी स्पर्धा करीत असतो.

परदेशी तांत्रिक ज्ञानाची आयात ही काही विकसनशील देशापुरती च मर्यादित आहे असे नाही. प्रगत देशांमध्येही अशा प्रकारची देवाण-घेवाण फार मोठ्या प्रमाणावर चालू असते. नुकतेच जर्मनीतील तीन मोठ्या कंपन्यांनी एकत्र येऊन गॅस टर्बाईनसाठी लागणारे तांत्रिक ज्ञान इंग्लंडमधील रोल्सरॉईस कंपनीकडून मिळविले आहे आणि अशा तांत्रिक ज्ञानांची आंतरराष्ट्रीय पातळीवर देवाण-घेवाण हे औद्योगीकरणाचे एक प्रभावी साधन आहे. याबाबत भारतानेसुद्धा मागे राहण्याचे कारण नाही.

गेल्या पंधरा वर्षांत आपल्या राष्ट्रीय प्रयोगशाळांनी बरीच माहिती उपलब्ध केली आहे. त्याचा यशस्वी रीत्या उपयोग केला

जात नाही असे मला वाटते. राष्ट्रीय प्रयोगशाळा व सल्लागार संस्था ह्यांमध्ये सहकार्य झाल्यास संशोधित ज्ञान उद्योगधंद्यांमध्ये मूर्त स्वरूप घेऊ शकेल. ह्या बाबतीत राष्ट्रीय प्रयोगशाळांनी पुढाकार घ्यावयास हवा.

धंद्यातल्या वाढीबरोबरच सल्लागार संस्थांनी पैशाची चणचण वाढतच असते. कारण त्यांना केलेल्या कामाचा मोबदला मिळण्यापूर्वीच अनेक बाबींवर पैसे खर्च करावे लागतात. ह्याकरिता सगळ्या सल्लागार संस्थांनी एकत्रित येऊन मुदतीची कर्जे मिळण्यासंबंधी संघटित प्रयत्न करावेत.

कंपनीचे कार्यकारी संचालक व त्यांचे समर्थ सहकारी यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नामुळेच आपल्याला २५ टक्के डिव्हिडंड देणे शक्य झाले आणि ह्याबद्दल त्यांचे अभिनंदन.

धन्यवाद.

(मूळ इंग्रजी भाषणाचा हा स्वैर अनुवाद असून मूळ इंग्रजी भाषणाची प्रत किर्लोस्कर कन्सल्टंटस् लि. पुणे ४ यांचेकडे मिळू शकेल.)

---

**किमान गरजा भागण्याचा सुदिन केव्हा उगवणार?**

आपल्या किमान गरजा भागविणे भारतीयांना १९७५ अखेर सुद्धा शक्य होणार नाही, असे महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी लेखी उत्तरात राज्यसभेला सांगितले आहे. १९६० साली नियोजन मंडळाने पाहणी करून सांगितले होते की १९७५ मध्ये किमान गरजा भागविता येण्याजोगी परिस्थिती निर्माण व्हावयाची असेल, तर वाढीची गती ह्या पंधरा वर्षांत दर साल ७% सतत राहावयास हवी. परंतु, ही गती अशक्य ठरली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेने वाढीच्या गतीचे लक्षच मुळी दर साल ५½% ठरविले होते, परंतु १९६०–६८ ह्या काळात प्रत्यक्ष दर साल वाढ ३% एवढीच झाली. १९६० साली १९७५ सालाकरिता ठेवलेले किमान गरजा भागविण्याचे उद्दिष्ट आता उरलेल्या काळात साध्य करावयाचे असेल, तर दर साल वाढीची गती १५% पर्यंत नेण्यात आली पाहिजे. परंतु, ५·५ ते ६% पेक्षा जास्त गतीने वाढ होण्याची शक्यता नाही, असे श्रीमती गांधींनीच मान्य केले आहे. ह्याचा अर्थ किमान गरजा भागण्याचा सुदिन उगविण्यास आणखी कित्येक वर्षे लागणार.

---

**कुटुंबनियोजनामुळे ५० लक्ष अर्भकांचा जन्म टळला**

कुटुंबनियोजनाच्या मोहिमेमुळे १९६९–७० अखेरपर्यंत ५० लक्ष अर्भके जन्मास येण्याचे टळले, असे सरकारतर्फे लोकसभेत सांगण्यात आले. लोकसंख्या वाढीची गती १९६६–६७ मध्ये २·५५% आणि १९६८–६९ मध्ये २·५४% होती, ती १९६९–७० मध्ये २·४८% वर उतरली. जननाचे दर हजार लोकवस्तीशी प्रमाण १९५१–६० मध्ये ४१·७ होते, ते १९६९–७० मध्ये ३८·३ वर उतरले. त्याबरोबरच मृत्यूंचे दर हजार लोकवस्तीशी प्रमाण २२·८ चे १३·५ वर आले.

---

**कापडाच्या नियंत्रित किमतीत वाढ नाही**—कापडाच्या नियंत्रित किमतीत वाढ करण्यास सरकार तयार नाही. इंडियन कॉटन मिल्स फेडरेशनने किमतीत वाढ करून मिळावी अशी मागणी केली आहे. ब्यूरो ऑफ इंडस्ट्रिअल कॉस्ट्स अँड प्राइसेसकडे हा प्रश्न सोपविला आहे. ब्यूरोचा रिपोर्ट आल्यावर सरकार ह्या प्रश्नाचा विचार करील, पण ब्यूरोचा रिपोर्ट मान्य करण्याचे सरकारवर बंधन नाही. सरकारने परदेशातून १३ लक्ष गाठी सूत आणण्याचे ठरविले आहे. देशी कपाशीचे उत्पादन घटले असून कपाशीच्या किमतीत फारच वाढ झाली आहे.

**आयात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण**—चालू वर्षअखेर ८०% आयात व्यापाराचे राष्ट्रीयीकरण केले जाईल; उरलेल्या २०% चे राष्ट्रीयीकरण त्यानंतर होईल, असे परराष्ट्रीय व्यापारमंत्र्यांनी लोकसभेत सांगितले.

**ऊस दिला, पण पैसे मिळाले नाहीत**—साखरकारखाने शेतकऱ्यांकडून जो ऊस विकत घेतात त्याची किंमत १४ दिवसांत देण्यात आली पाहिजे, अशी केन कंट्रोल ऑर्डर आहे. तरी सुद्धा, शेतकऱ्यांना त्यांच्या उसाच्या मिळावयाच्या रकमेचा आकडा ३० सप्टेंबर, १९७० रोजी २०·८२ कोटी रु. एवढा मोठा होता. गेल्या वर्षी तो फक्त १·१४ कोटी रु. होता. सरकारी साऱ्याच्या वसुलीप्रमाणे उसाच्या किंमतीचे पैसे साखरकारखान्यांकडून वसूल करण्याचा राज्य सरकारांना अधिकार आहे.

**रेल्वेज तुटीचा उच्चांक गाठणार**—हिंदी रेल्वेज चालू वर्षी २२·३८ कोटी रुपये नफा दाखवितील अशी अंदाजपत्रकात अपेक्षा होती; त्याऐवजी ४६·६ कोटी रु. नुकसानच येईल, असे रेल्वे मंत्र्यांनी जाहीर केले आहे. १९६७-६८ मध्ये ३१·५३ कोटी रुपये, १९६८-६९ मध्ये ७·८६ कोटी रुपये आणि गेल्या वर्षी ९·८३ कोटी रुपये रेल्वेजना तूट आली होती.

**तंदुरी चिकनसाठी विमानाचा खोळंबा**—इंडियन एअरलाइन्सच्या स्टुअर्डला तंदुरी चिकन खाण्यासाठी हवे होते. ते दुसरीकडून आणावे लागले. त्यामुळे कोचीन येथून विमान सुटण्यास एक तास उशीर झाला, अशी माहिती राज्यसभेत एका सभासदाने सांगितली. इतर कोणताही मांसाहारी पदार्थ हा स्टुअर्ड खाण्यास तयार नव्हता.

**बेकारीची नोंद केलेले पदवीधर शास्त्रज्ञ**—उद्योगविनिमय केंद्रात ५२,९३५ पदवीधर शास्त्रज्ञांची नावे नोकरीसाठी नोंदलेली आहेत. पदव्युत्तर शिक्षण घेतलेले ५,८९४ शास्त्रज्ञही बेकारांच्या पटावर आहेत. वरील आकड्यांत बेकार इंजिनिअर्सचा समावेश केलेला नाही.

**मंत्र्यांकडील भाड्याची थकबाकी**—मध्यवर्ती मंत्री, माजी मंत्री, खासदार आणि माजी खासदार ह्यांचेकडे मार्च, १९७० अखेर भाड्याच्या पोटी २,५७,२४२ रु. थकलेले होते. वीज, पाणी आणि फर्निचरचे भाडे ह्यांबाबत थकबाकी वेगळी.

---

# जाहिरातीमध्ये लैंगिक आकर्षणाचा अतिरेक केला जात आहे काय ?

## जाहिरातदारांना आरोप अमान्य

आशिआई जाहिरातदार परिषदेचे सातवे अधिवेशन दिल्ली येथे नुकतेच भरले होते. त्यास सुमारे ७०० प्रतिनिधी उपस्थित होते. भारताचे माहिती आणि ध्वनिक्षेपण खात्याचे मंत्री, श्री. सत्यनारायण सिंह ह्यांनी परिषदेचे उद्घाटन केले, त्यावेळी ते म्हणाले, "ह्या देशातील वृत्तपत्रीय जाहिरातींना अनिष्ट वळण लागलेले आहे. विवक्षित काळी समाजाच्या बहुसंख्य घटकांनीं जी नैतिक मूल्ये स्वीकारलेली असतात, त्यांच्याशी विसंगत अशा जाहिराती छापणे जाहिरातींच्या सामाजिक उद्दिष्टांना धरून नाही. ह्या प्रश्नाकडे जाहिरात तज्ज्ञांनी विशेष लक्ष द्यावे." ह्या विषयी लोकसभेत ते म्हणाले, "वृत्तपत्रातील जाहिरातींमधील नग्न चित्रे आणि त्यांची कामुकता ह्याविषयी सरकार सर्व दृष्टींनी विचार करीत आहे; कामवासनेला आवाहन करण्याच्या जाहिरातींच्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी उपाय योजण्यात येणार आहेत. ह्या संबंधात मी राज्य सरकारांना लिहिले आहे. अ. भा. वृत्तपत्र संपादक परिषदेनेही आपल्या सदस्यांचे ह्याकडे लक्ष वेधले आहे."

चित्रे, मजकूर, डिझाइन, ले आउट, इत्यादींमध्ये लैंगिकतेला वृत्तपत्रीय जाहिरातींतून स्थान असू नये, असा श्री. सत्यनारायण सिंह ह्यांचा आग्रह आहे. जाहिरातदारांना हे मान्य नाही. जाहिरातीमध्ये तसे फारसे काही नसते आणि त्याचा विनाकारणच बाऊ केला जात आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. यु. न्यूज ऑफ इंडियाने कित्येक जाहिरातदार संस्थांचे प्रमुख आणि संबंधित जबाबदार व्यक्ती ह्यांच्या ह्याविषयी मुलाखती घेतल्या. त्या सर्वांच्या मते, श्री. सिंह ह्यांनी रेखाटलेले चित्र अतिरंजित आहे. समाजातील बहुसंख्य घटकांच्या नैतिक मूल्यांना जाहिराती धरूनच असतात; अश्लीलतेचा स्पर्श करण्याची जाहिरातींची प्रवृत्ती नसते. काही जाहिरातीत लैंगिक आकर्षणाला प्राधान्य असेल, पण सर्वच्या सर्वच जाहिरातीवर आक्षेप घेणे योग्य नाही. ह्या प्रवृत्तीला जाहिरातदार स्वतःच आळा घालतीलही, पण जाहिरातीत लैंगिक आकर्षणास बंदी घालणे कधीच मान्य होणार नाही. "अत्यंत स्पर्धामय बाजारपेठेत आम्हांला आमच्या गिऱ्हाइकांचा माल खपविण्याचा असतो आणि त्यासाठी सेक्स इतके प्रभावी आकर्षण दुसरे कोणतेही नसते" असा जाहिरातदारांचा दावा आहे. प्रेस कौन्सिल धर्तीवर अॅडव्हर्टायझिंग कौन्सिल नेमण्याची सरकारची सूचना त्यांना मान्य आहे; उलट त्यांचीच त्यासाठी घाई चालू आहे. मुलाखत घेतलेल्या तज्ज्ञांपैकी फक्त एकच तज्ज्ञ मंत्रिमहाशयांना पाठिंबा देणारा निघाला. "अशा जाहिरातीमुळे तरुणांत विकृती निर्माण होणे अगदी शक्य आहे आणि त्याकारणाने हिंदी समाजाच्या नैतिक व सांस्कृतिक मूल्यांस धक्का बसण्याचीही शक्यता आहे. हिंदी जाहिरातीवर पाश्चात्य संस्कृतीचा पगडा आहे; शहरी श्रीमंतांनी ती संस्कृती अंगीकारली आहे. परंतु ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांच्या संस्कृतीशी ह्या जाहिराती विसंगत असतात. जाहिरातींनी जिनसांची जाहिरात करावी; मानवी मानसिक दौर्बल्याचा गैरफायदा उठवू नये" असे मत त्यांनी व्यक्त केले.

आशिआई जाहिरातदार परिषदेचे अध्यक्ष, श्री. एस. ए. पीरभॉय, ह्यांनी हिंदी जाहिरातदारांची बाजू मांडली. ते म्हणाले "ह्या जाहिराती भारतीय संस्कृतीशी विसंगत नाहीत. त्यांचा संदेश प्रत्यक्ष भिडणारा असला आणि चित्रे व मजकूर सत्य जीवनाला धरून असली, तर त्याचा अर्थ एवढाच की समकालीन प्रगतीपर मोकळ्या वातावरणाचा तो परिणाम आहे. ह्या जाहिराती मुख्यत शहरी वृत्तपत्रातूनच येतात; तेथील चोखंदळ गिऱ्हाइकांचे लक्ष वेधून त्यांच्या गरजेच्या जिनसा त्यांच्या नजरेसमोर आणणे हा त्यांचा उद्देश असतो. जिन्नस आणि त्यांचे गिऱ्हाइक ह्यांना साजेशीच जाहिरातीच्या चित्राची व मजकुराची योजना असायला हवी. त्यात सेक्स आली, तर ती अटळ आहे."

श्री. फरुख ए. मुल्ला म्हणाले, "जाहिरातीत सेक्सचा उपयोग करण्यात काहीच आक्षेपार्ह नाही. त्यात अभारतीयही काही नाही. ह्या देशापेक्षा पाश्चात्य देशातच सेक्सला बंदी होती. आपल्या धार्मिक ग्रंथातून सेक्सला आरोग्यप्रद मानले आहे; त्यामुळे आत्म्याला तृप्ती मिळते असेच म्हटले आहे. देशातील लक्षावधी लोकांना काय हवे आणि काय नको, हे ठरविण्याची १०–१५ लोकांना काय पात्रता असणार! अॅडव्हर्टायझिंग कौन्सिल जरी स्थापन झाले, तरी त्याचा काही उपयोग नाही. जाहिरातींवर कोणतीही बंधने असता कामा नयेत."

श्री. जाधवकुमार मिथिया म्हणाले, "आपण आयुष्यातून सेक्स टाळू शकतो का? पोहोण्याच्या पोषाकाची जाहिरात करावयाची, तर तो पोषाक समुद्र किनाऱ्यावरील सुंदर तरुणी आणि उमदे तरूण ह्यांच्या अंगावरच दाखविला पाहिजे."

श्री. सुरेंद्र प्रिती म्हणाले, "हिंदी जाहिरातीमधील सेक्सचे स्थान स्थिर झालेले आहे. ते अप्रमाण असू नये." श्रीमती शीला कृपलानी म्हणाल्या, "सौंदर्य प्रसाधनांच्या जाहिरातींत आकर्षक स्त्रियांची चित्रे आवश्यकच आहेत. त्यासेरीज ह्या जिनसांचा भरपूर खप होणार नाही. जाहिरातीत अश्लीलता असू नये हे मला मान्य आहे. पण समाज सुधारत जातो, त्याप्रमाणे त्याच्या आवडीनिवडीही बदलत जातात; सामाजिक वृत्तीतही फरक पडतो हे विसरता कामा नये. फॅशन्स आणि पोशाख किती बदलले आहेत, पाहा. चोळीमुळे किंवा मिनीसाडीमुळे नैतिक अधःपात झाला आहे काय?"

इलस्ट्रेटेड वीकलीचे संपादक श्री. खुशवंतसिंग म्हणाले, "सेक्स अपिलाचे भांडवल करण्याचा जाहिरातदारांचा उद्देश असतो आणि त्यात वावगे काहीच नाही. ह्याचा अर्थ अश्लीलतेचा

पुरस्कार अथवा समर्थन मात्र नव्हे. हिंदी वृत्तपत्रातील कोणतीही जाहिरात अश्लील ह्या सदरात येत नाही. अशी जाहिरात माझ्या पाहण्यात आलेली नाही. जाहिरातीच्या क्षेत्रापासून सरकारी ढवळाढवळ पार दूर ठेवली पाहिजे. जाहिरातदार आणि संपादक ह्यांना सामाजिक जबाबदारीची पुरेशी जाणीव आहे. ”

प्रतिभा ॲडव्हर्टायझिंगचे श्री. वि. म. पळणिटकर ह्यांनी आपले विचार व्यक्त करताना अर्थाच्या प्रतिनिधीला सांगितले, “ जाहिरातीमध्ये सेक्सचा उपयोग सर्रास केला जात नाही, इतकेच नव्हे तर फारच थोड्या जाहिरातींत केला जातो. शेकडा ९० जाहिरातींत ( अगदी फुलपेज जाहिरातींतही ) सेक्सचा अभावच आढळेल. वाचकांनी स्वतः माझे म्हणणे पडताळून पाहावे. फारच थोड्या, अपवादात्मक जाहिरातींमधील डोळ्यांत भरणाऱ्या सेक्सचा विनाकारण बाऊ केला जात आहे. कारखानदाराला जाहिरातीपासून गिऱ्हाईक हवे असते; पैसे खर्चून माल खरीदणारे गिऱ्हाईक हवे असते. कामुकतेच्या आकर्षणाने जाहिरात अधाशीपणाने बघणारे आणि मालाची खरी गिऱ्हाइके ही अगदी वेगळी असू शकतात. मोठमोठ्या, प्रथितयश कारखान्यांच्या जाहिरातींत सेक्स आढळत नाही, ह्याचे कारण त्या कारखानदारांनी बाजारपेठेचा आणि गिऱ्हाइकांच्या आवडीनिवडीचा व कुवतीचा सतत अभ्यास चालू ठेवलेला असतो. त्यामुळे, हे कारखानदार त्या दृष्टीने जाहिरातींची मांडणी करवून घेतात; सेक्स अपीलची जादा तरफदारी करणारे स्वतःचीच दिशाभूल करून घेत आहेत. जाहिरातीवर खर्च करणारे कारखानदार आणि जाहिराती तयार करणाऱ्या जाहिरात एजन्सीज ह्या दोघांतही जेथे अपरिपक्वता असेल, तेथेच सेक्सयुक्त जाहिरातींवर अवास्तव भर दिला जातो. केवळ आर्थिक सुपरिणामालाच महत्त्व देणारे सेक्सपासून सामान्यतः दूरच राहतात; गिऱ्हाइकांच्या व्यावहारिक दृष्टीलाच त्यांच्या जाहिरातींचे आवाहन असते. काही प्रकारच्या जिनसांच्या खपाला सेक्स-अपीलयुक्त जाहिराती उपयोगी पडतात, पण अशांसाठी सेक्सचा वापर करणे वेगळे आणि सर्वच जाहिरातींसाठी त्याची तरफदारी करणे वेगळे. सध्या सेक्सयुक्त जाहिरातींत थोडी वाढ झाल्यासारखी वाटली, तरी एकूण जाहिरातींच्या मानाने ती फारशी नाही. सरकारने लक्ष घालावे, एवढ्या महत्त्वाची ही बाब नाही. वाचकांनी वृत्तपत्रांतील मोठाल्या जाहिराती जरूर पाहाव्या म्हणजे माझ्या म्हणण्याची त्यांना प्रचिती येईल. एकाद-दुसऱ्या कामुक जाहिरातीवरून सर्व जाहिरातींबद्दल सर्रास चुकीचे निष्कर्ष काढून उपाययोजनेचा खटाटोप करणे अप्रस्तुत आहे; तर्कशुद्ध नाही. सेक्सचे समर्थन करणारे जाहिराततज्ज्ञ आणि सेक्सचे उच्चाटन करू पाहणारे, ह्या दोघांचीही अतिव्याप्तीची चूक होत आहे. गिऱ्हाइकांच्यासंबंधी बऱ्याच खर्चाची पुरेशी पाहणी न करता सेक्सचा उपयोग करून जाहिराती तयार करणे सोपे असते, एवढेच. कोलगेट, बिनाका, कॉमप्लांट, बोर्नव्हिटा, व्हिवा, व्हिम, डेट, मॅजिक, रिम, बोनस, लक्स, डालडा, साना, हिमा, ॲस्प्रो, ॲनॅसिन, गोदरेज, पार्ले, ब्रिटॅनिया इत्यादींच्या जाहिरातींत सेक्स कुठे असते? ”

## पक्ष सोडण्यासाठी जर्मनीमध्येही लाच देण्याचा प्रयोग

पश्चिम जर्मनीमधील सत्तारूढ पक्षाच्या एका सदस्याला, त्याने तो पक्ष सोडून विरुद्ध बाजूच्या पक्षास येऊन मिळावे ह्यासाठी ९ लक्ष रुपयांची लाच देऊ करण्यात आली, असे वृत्त प्रसिद्ध झाले आहे. भारतात हा प्रकार आता नित्याचा झाला आहे. जगात कुठेही गेले तरी मनुष्याला काहीतरी किंमत दिल्यास तो विकत मिळू शकतो असाच अनुभव आहे. संपत्ती आणि दारिद्र्य ह्यास अनुसरून तत्त्वच्युतीसाठी किंमत किती ठरेल, एवढाच प्रश्न आहे. जेथे संपत्ती भरपूर असेल तिथे माणसे स्वस्तात खरीदता येणार नाहीत हे उघड आहे. तत्त्वनिष्ठेसाठी काही किमान आर्थिक स्वास्थ्य लागते; केवळ नीतिशिक्षण उपयोगी पडत नाही. दारिद्र्यात संधिसाधूपणास आणि शिस्तभंगास ऊत येतो आणि मग मतलबी लोक त्याचा फायदा घेतात. तो उत्कर्षाचाही राजमार्ग होऊन बसतो. अशा परिस्थितीत नीतिशिक्षणाचा प्रभाव पडू शकत नाही; अनीतीचा किफायतशीरपणाच प्रभावी ठरतो.

## पोस्टाचे दर वाढण्याची पूर्वसूचना

पोस्ट आणि तार खात्याच्या दर चौकशी समितीने पोस्टाच्या दरात वाढ करण्यात यावी, असे सुचविले आहे. ह्या सूचना सरकारने मान्य केल्या आहेत, परंतु त्या अद्याप कार्यवाहीत आणलेल्या नाहीत. पोस्टकार्ड, अंतरदेशीय पत्रकार्ड आणि पाकीट ह्यांच्या दराचे प्रमाण दोन : तीन : चार असे असावे, अशी समितीची शिफारस आहे. म्हणजे, पोस्टकार्डाला १२ पैसे, अंतरदेशीय पत्रकार्डाला १८ पैसे आणि पाकिटाला २४ पैसे पडतील. कार्ड इकडून तिकडे पाठवून पोचविण्यासाठी सरकारला सरासरीने १६·४ पैसे एवढा खर्च येतो परंतु कार्ड फक्त १० पैशांस विकले जाते. त्यामुळे खात्याला दर साल त्यापायी ८·१६ कोटी रु. नुकसान सोसावे लागते.

## नोकरी शोधणाऱ्या स्त्रियांच्या संख्येत प्रचंड वाढ

भारतात एकूण सुमारे ४०० उद्योग विनिमय केंद्रे आहेत. त्यात रोजगार–नोकरीसाठी नावे नोंदणाऱ्या स्त्रियांची संख्या १९६३ ते १९६८ ह्या काळात ८१% ने वाढली आहे. ह्याच काळात नावे नोंदणाऱ्या पुरुषांची संख्या फक्त १४% ने वाढली. नोंदलेल्या बेकारांच्या प्रत्येक विभागात—मॅट्रिक पास, इंटर पास, पदवीधर, पदव्योत्तर शिक्षण घेतलेले—स्त्रियांनी पुरुषांना नोंदणीच्या बाबतीत मागे सारले आहे.

मुस्लिम स्त्रियांनी पुरुषांबरोबर प्रार्थना केली—मुस्लिम स्त्रियांनी पुरुषांचे समवेत प्रथमच रमजान ईदचे वेळी मुंबई येथे प्रार्थना केली. त्यांच्यासाठी वेगळी जागा राखून ठेवली होती. मुस्लिम स्त्रियांत सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी अंजुमान–इ–इस्लामने हा प्रयोग केला.

प्रमुख बँकांच्या अंतर्गत व्यवस्थेची पाहणी—सेंट्रल बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक आणि अलाहाबाद बँक या चार बँकांच्या अंतर्गत व्यवस्थेची, विशेषत: अंतर्गत ऑडिटच्या पद्धतीची पाहणी करण्यासाठी आणि त्यांतून सर्व राष्ट्रीयीकृत बँकांची व्यवस्थेच्या दृष्टीने पुनर्घटना सुचविण्यासाठी मध्यवर्ती सरकारने रिझर्व्ह बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर श्री. बी. एन. आडारकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आहे. १९७१ च्या पहिल्या तिमाहीत कमिटीचा अहवाल तयार होईल अशी अपेक्षा आहे.

निर्गत मालाची मुद्दाम कमी रकमेची बिले करणाऱ्या २८ फर्म्सना दंड—परदेशी माल पाठविला म्हणजे त्याची बिले मुद्दामच कमी रकमेची दाखवावयाची; ज्याला माल मिळावयाचा त्याला मात्र खऱ्या बिलाची रक्कम मागावयाची; दोन्हींमधील जी तफावत निघेल, ती परदेशात तशीच गुप्त ठेवून आपल्या गरजे-प्रमाणे तिचा विनियोग करायचा; सरकारला तेवढ्या परदेशी चलनाला बुडवावयाचे, असे कित्येक निर्गतदार करीत असतात. १९६७ ते १९७० या मुदतीत अशा २८ फर्म्सना दंड करण्यात आला.

परदेशात लॉटरी तिकिटांची विक्री—पंजाब सरकारने परदेशांत लॉटरीची तिकिटे विकण्यासाठी मध्यवर्ती सरकारची परवानगी मागितली होती, ती अमान्य करण्यात आली आहे.

राष्ट्रीय उत्पन्न आणि दरमाणशी उत्पन्न—भारताचे राष्ट्रीय उत्पन्न १९६६–६७ मध्ये २३,६२४ कोटी रु. होते, ते १९६८ मध्ये २८,५८३ कोटी रु. झाले. म्हणजे, दरमाणशी उत्पन्न ४७०·८ रु. वरून ५४२·३ रुपयांवर गेले.

इरकली साड्या घेऊन जाणार—म्हैसूरचे मुख्य मंत्री श्री. वीरेंद्र पाटील लवकरच ऑस्ट्रेलियाला जाणार आहेत, त्यावेळी तेथील यजमानिणींना भेट देण्यासाठी ते बरोबर इरकली साड्या घेणार आहेत. ते जपानला गेले, तेव्हा त्यांनी म्हैसुरी अगरबत्त्या नेल्या होत्या.

सरकारचा जाहिरात खर्च—मध्यवर्ती सरकारने गेल्या वर्षी जाहिरातींवर १,१९,०७,१३७ रु. खर्च केला.

प्रिन्स चार्लसचे प्रेमात पदार्पण—ब्रिटिश गादीचा वारस २२ वर्षांचा प्रिन्स चार्लस हा २० वर्षे वयाच्या एका तरुणीशी प्रेम करू लागला आहे. ही तरुणी शिक्षिका होण्यासाठी शिक्षण घेत आहे. ती चार्लसची पाहुणी म्हणून बाल्मोरल आणि विंडसर राजवाड्यात राहून गेली आहे. प्रिन्स चार्लसचे प्रेमातील पहिले पाऊल लंडनमध्ये कौतुकाने चर्चिले जात आहे.


THE BELGAUM BANK LIMITED

Estd. 1930

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

Working Funds : Over Rs. 7 Crores

Share Capital & Reserves : Over Rs. 17 Lacs

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT *General Manager.*

K. B. KIRTIKAR *Chairman.*

महाराष्ट्रातील नामवंत बँक

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना – १९३६

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

सातारा

रजिस्टर्ड ऑफिस : १४३–१४६, भवानी पेठ, सातारा शहर.

आपल्या ५० शाखांनिशी आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात तत्पर.

खेळते भांडवल : १३·७५ कोटींचे वर

ठेवी : १३·२५ कोटींचे वर

ठेवींचे आकर्षक व्याजाचे दर.
तऱ्हेतऱ्हेच्या उद्योगधंद्यांस साहाय्य.
कोणत्याही शाखेस भेटा अगर लिहा.

वि. श्री. दामले
बी. ए., एम्. कॉम्., एलएल बी., ए. आय्. आय्. सी. चेअरमन

चवदार पिठासाठी

# पिठाच्या चक्क्या



- बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
- मजबूत बांधणी
- अद्यावत् यंत्र योजना
- साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९

उत्पादक –

**भिडे अ‍ॅन्ड सन्स प्रा. लि. सांगली**

**महाराष्ट्र राज्य.**

स्थापना १९३४

**माकडछाप काळी टूथपावडर**

म्हणजेच

नोगी आणि कंपनी प्रा. ली.


मुंबई ६१ ओ. ओस.

सोल सेलींग अेजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

२७० जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI



इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३१ तार : Vijayplow

## पुस्तके, वृत्तपत्रे, रेडिओ आणि चित्रपट

### लोकप्रियतेमधील विविधता

युरोपात जगातील १३% लोक राहतात पण तेथे जगातील एकूण पुस्तकांपैकी ४४% पुस्तके प्रकाशित होतात. आफ्रिकेत १०% लोक राहतात, तेथे १.६% पुस्तके प्रकाशित होतात.

स्वीडनमध्ये वृत्तपत्रांचा खप दर हजार लोकवस्तीस ५१८ एवढा आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये त्याचे प्रमाण ४६३ आहे. जपानमध्ये ते ४९२ आहे. ४३ देश असे आहेत की ज्यात एकही दैनिक प्रसिद्ध होत नाही.

जगातील एकूण रेडिओ सेट्सपैकी ६७.४ कोटी सेट्स उत्तर अमेरिकेत आहेत. मोरोक्कोमध्ये दर हजार वस्तीस १५ असे प्रमाण १९५० मध्ये पडले; आता ते ५७ पर्यंत वाढले आहे.

सर्वात जास्त सिनेमाशौकीन तैवानमध्ये आहेत. १९६७ मध्ये तेथील प्रत्येकाने सरासरीने ६६ चित्रपट पाहिले. ग्रेट ब्रिटनमध्ये हे प्रमाण ४, अमेरिकेत ७, रशियात २०, असे पडले. आफ्रिकेत वर्षातून एकदाही चित्रपट न पाहणारे बहुसंख्य आहेत.

अविकसित देश अधिकाधिक चित्रपट निर्माण करीत आहेत, तर पाश्चात्य औद्योगिक देशांत त्यांची निर्मिती घटत आहे. चित्रपट निर्मितीत भारताचा सबंध जगात दुसरा अनुक्रम आहे.

---

### खताचा दरसाल १० लक्ष मेट्रिक टनांचा तुटवडा

शेतीच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते–मोठे पीक देणारे बी-बियाणे, वाढता पाणीपुरवठा आणि खतांचा भरपूर वापर. १९६९–७० मध्ये भारतात एकूण ४०० कोटी रुपयांची खते विकली गेली, त्यांपैकी २०० कोटी रुपयांची खते परदेशांतून आयात केलेली होती. १९६९–७० मध्ये भारतात फक्त ९,३४,००० मेट्रिक टन रासायनिक खतांचे उत्पादन झाले. चालू वर्षी उत्पादनात १०% वाढ झाली, तरी खप त्याहीपेक्षा जास्त गतीने वाढत आहे. १९६९–७० मध्ये २० लक्ष मेट्रिक टन खतांचा वापर करण्यात आला. ह्यापुढे दरसाल १५% गतीने वापर वाढेल. ह्याचा अर्थ दरसाल १० लक्ष मेट्रिक टनांचा तुटवडा कायमच राहील. सध्या खतांचे सात कारखाने उभारण्यात येत आहेत. त्यांचे काम सुरू झाले आणि विद्यमान कारखान्यांची कार्यक्षमता वाढली, तरी तूट दरसाल ८ लक्ष टनांच्या खाली जाण्याचा संभव नाही. ह्यासाठी खतनिर्मितीचे अधिक कारखाने हवेत.

---

### फिजी ९६ वर्षांनी पुन्हा स्वतंत्र झाला

फिजीला राष्ट्रसंघाचे सभासदत्व देण्यात आले आहे. म्हणजे आता १२७ देश राष्ट्रसंघाचे सभासद झाले आहेत. ९६ वर्षांपूर्वी फिजीचा राजा ककोबू ह्याने फिजी बेटे राणी व्हिक्टोरियाला बहाल केली; तिचा वंशज प्रिन्स चार्लस ह्याने आता ती बेटे तेथील जनतेच्या फिरून ताब्यात दिली. अशा रीतीने, फिजीचे ५ लक्ष नागरिक पुन्हा स्वतंत्र झाले. १० ऑक्टोबर, १८७४ पासून ९६ वर्षे फिजी बेटांचा ब्रिटिश वसाहतीत समावेश होता. फिजी बेटे पॅसिफिक महासागरात ऑस्ट्रेलियाच्या पूर्वेला असून त्यात ९०० बेटे आहेत. त्यांपैकी १०६ बेटांवर वस्ती आहे. सर्व बेटांचे मिळून क्षेत्रफळ ७,०५५ चौरस मैल आहे. बेटांच्या ५,१२,००० लोकसंख्येपैकी ४१% फिजिअन्स, ५०% भारतीय आणि ५% युरोपियन्स आहेत. फिजीअन्समध्ये मेथॉडिस्ट, अँग्लिकन, प्रेसबिटेरियन, रोमन कॅथॉलिक, हिंदू, मुसलमान, इत्यादी धर्मीयांचा समावेश होतो. साखर, नारळ, केळी, तांदूळ, अननस, कोको, तंबाखू ही प्रमुख उत्पादने असून सोने आणि मँगेनीज ह्यांच्या तेथे खाणी आहेत.

---

### जे भारतात, तेच युरोपात

झोपडपट्टीत राहणारे लोक राहण्यास घरे मिळावीत म्हणून भारतात निदर्शने करतात, मंत्र्यांच्या सभांत अडथळा आणतात, तसाच प्रकार इटलीत घडत आहे. ८ नोव्हेंबर रोजी दुपारी पोप महाशय रोममध्ये नेहमीप्रमाणे खिडकीत उभे राहून दर्शनाला आलेल्यांना आशीर्वाद देत होते. सेंट पीटर्स चौकात सुमारे ४०० ते ५०० झोपडपट्टीवाले घुसले आणि "झोपडपट्ट्या नकोत, घरे हवीत" अशा घोषणा करू लागले. त्यांनी सकाळीच नुकत्याच बांधलेल्या नव्या घरात अनधिकाराने प्रवेश केला होता आणि पोलिसांनी त्यांना हुसकावून लावले होते. ते निदर्शनाच्या जागी अंथरूण, पांघरूण, सतरंज्या, खुर्च्या, इत्यादी घेऊन ४० मोटारीतून आणि ट्रक्समधून आले. लोकांनी पोपला बोलू न देण्याचा हा पहिलाच अनुभव होता. "तुमचे देव भले करील" ह्या आशीर्वादावर लोक विसंबून राहण्यास तयार नाहीत.

---

### पूर्व पाकिस्तानातील वादळी आपत्तीचे रुद्र स्वरूप

पूर्व पाकिस्तानातील वादळाची आपत्ती सबंध जगातील २० व्या शतकातील सर्वांत मोठी आपत्ती ठरेल. 'पाकिस्तान टाइम्स' च्या अंदाजाप्रमाणे, ह्या आपत्तीत १०,००,००० लोक मृत्युमुखी पडले असावे. हा अंदाज खरा असेल तर चीनमधील १८८७ मधील पीत नदीच्या महापुराच्या आपत्तीच्या खालोखाल जागतिक विक्रमाची ही नैसर्गिक आपत्ती ठरेल. चीनमधील आपत्तीचा अंदाज १०,००,००० पासून ७०,००,००० मृत, एवढा मोठा आहे. ५०,००० चौरस मैलांवर पसरलेल्या ह्या आपत्तीचा अचूक अंदाज करणेच अशक्य झाले होते.

---

### डिलिव्हरी पोस्टाचे शिक्के बंद होणार

महाराष्ट्रातील सर्वच डिलिव्हरी पोस्ट ऑफिसांतून डिलिव्हरीसाठी आलेल्या टपालावर शिक्के मारणे १५ डिसेंबरपासून बंद करण्यात येणार आहे.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



बवन सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५३३७१ कारखाना : २७१०१

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)